जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत "सामान्य विकास व पध्दती सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला कर्ज" तसेच "अनुसुचित जातींसाठी विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्तीत दिवे लावण्याकरीता कर्ज" या लेखाशिर्षाखालील कर्ज स्वरुपात मिळणारी रक्कम यापुढे महावितरण कंपनीस अनुदान स्वरुपात देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१३/प्र.क्र.१२८/ऊर्जा-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० डिसेंबर, २०१३

**प्रस्तावना** : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत "सामान्य विकास व पध्दती सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला कर्ज" तसेच "अनुसुचित जातींसाठी विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्तीत दिवे लावण्याकरीता कर्ज" या योजनांतर्गत शासनाकडून महावितरण कंपनीस कर्ज स्वरुपात निधी वितरीत करण्यात येतो.

२. जिल्हा नियोजन व विकास मंडळ निधीतून सर्वसाधारण योजनेअंतर्गत केली जाणारी कामे:- (अ) वाडी/वस्ती विद्युतीकरण, वाढीव पथदिवे व इतर, (ब) पध्दती सुधारणाअंतर्गत उच्च दाबाच्या वीज वाहिन्या, लघुदाबाच्या वीज वाहिन्या उभारणे, नवीन रोहित्र, रोहित्र क्षमता वाढ व इतर कामे.

३. दलित वस्तीत दिवे लावण्याकरीता कर्ज या योजनेअंतर्गत केली जाणारी कामे :- (अ) नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसुचित जाती व नवबौध्दांना मोफत घरगुती वीज जोडणी देणे, (ब) दलित वस्तीत पथदिवे लावणे, (क) अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या मालकीच्या विहीरींवरील कृषी पंपांचे विद्युतीकरण करणे.

४. उपरोक्त कामे ही लोकोपयोगी व सामाजिक बांधिलकी या तत्त्वातून ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्याच्या उद्देशाने केली जातात. लाभार्थी ग्राहकांकडून या साहित्याचा खरेदी खर्च तसेच उभारणी इ. चा खर्च वसूल केला जात नाही. ही योजना राबविल्यानंतर लाभार्थ्यांकडून त्यांनी वापरलेल्या वीजेव्यतिरीक्त अन्य कोणताही आकार महावितरण कंपनीकडून आकारला जात नाही. या कारणास्तव सद्य:स्थितीत राबविण्यात येणाऱ्या "सामान्य विकास व पध्दती सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला कर्ज" तसेच "अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्तीत दिवे लावण्याकरीता कर्ज" या योजनांतर्गत शासनाकडून देण्यात येणारा निधी महावितरण कंपनीस यापुढे कर्ज स्वरुपात न देता अनुदान स्वरुपात देणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत "सामान्य विकास व पध्दती सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला कर्ज" तसेच "अनुसुचित जातींसाठी विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्तीत दिवे लावण्याकरीता कर्ज" या लेखाशिर्षाखालील कर्ज स्वरुपात मिळणारी रक्कम सन २०१३-१४ पासून राज्य शासनाकडून अनुदान स्वरुपात देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१०-११, सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वर्षात उपरोक्त दोन्ही योजनांतर्गत महावितरण कंपनीला कर्ज स्वरुपात दिलेल्या निधीवरील व्याज सन २०१३-१४ पासून शासनास देणे थांबवावे, तसेच सदर कर्ज अनुदानात परीवर्तीत करण्यात यावे, यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाचा अनौ.स. क्र. १३२/१३/विघयो, दि. २१/०६/२०१३, नियोजन विभागाचा अनौ. सं. क्र. ३०५/१४६१. दि. २०/०७/२०१३ व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ. संदर्भ क्र.: ३८६/१३/व्यय-१६, दि. ०४/१२/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१३१२३०१२११०२६८१० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ. प्र. रामटेके)
शासनाचे उपसचिव

प्रती,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद,विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई -५
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२ नागपूर
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१५) मुख्य अभियंता (विद्युत), महाराष्ट्र शासन, सा.बां.वि., मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
१६) अवर सचिव (रोखशाखा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) कक्ष अधिकारी, (प्रशासन-२), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) कक्ष अधिकारी, (१४६४/१४८१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) कक्ष अधिकारी (विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.